पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ८

**सभावृत्तांत**

दिनांक - **२५/०७/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२५/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.गीता सुशिल मंचरकर
६. मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी, मा.रत्नपारखी – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **११/०७/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २५/०७/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.शशिकांत कदम अनुमोदक : मा.विकास डोळस
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/३६/पिं.गुरव/२६२/२०१७, दि.१९/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, मौजे सांगवी पर्यंत संरक्षण विभागाच्या हद्दीलगत असलेल्या मंजूर विकास योजनेतील १२ मी./१८ मी. रूंद रस्त्यालगत संरक्षण विभागाच्या हद्दीतून आणखी १२ मी. रूंद रस्ता करणे व या व्यतिरिक्त मौजे सांगवी स.नं. ६८ पासुन (बी.आर.घोलप कॉलेजची उत्तरेकडील बाजू) ते नवी सांगवी बस स्टॉप पर्यत अतिरिक्त २४ मी. रस्ता तसेच यापूर्वीच्या संरक्षण विभागाने मंजूरी दिलेल्या **H to I ($R_3$)** रस्त्याकरीता अतिरिक्त १२ मी. रूंद रस्ता करणे आवश्यक आहे. सदरचा अतिरिक्त रस्ता केल्याने, सदर रस्ता हा दोन बीआरटी

रस्त्यांना जोडणार असल्याने वाहतुकीसाठी फीडर रूट म्हणून उपयोगात येणार आहे. तसेच सदर भागाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला असल्याने वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने सदरचा रस्ता होणे गरजेचे आहे. सदर नियोजित रस्त्यांची लांबी सुमारे **४९३० मी.** इतकी असणार आहे. सदरची जागा सुमारे **६३९६० चौ.मी.** व विकास योजनेतील १२ मी. व १८ मी. रूंद रस्त्यामधील उर्वरित क्षेत्रासह एकुण क्षेत्र संरक्षण विभागाचे असल्याने सदरचे क्षेत्र संरक्षण विभागाकडून मनपास हस्तांतरीत करावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने संरक्षण विभागास सदर जागेचे नियमानुसार मुल्य अदा करावे लागणार आहे. तरी सदरची जागा संरक्षण विभागाकडुन मनपास हस्तांतर करून घेऊन संरक्षण विभागास सदर जागेचे मुल्य अदा करणे व त्यासाठी आवश्यक सर्व्हेक्षण, मोजणी करणे इत्यादी अनुषंगिक मंजुरीसह येणा-या सर्व खर्चाबाबत मा. आयुक्तसो यांना संपुर्ण अधिकार देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सागर बाळासाहेब गवळी )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९९८/२०१७
दिनांक : २५/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.